**वि.दि.दा. क्र. १/२०२२**
जिवराज वि मनोज
**निशाणी क्र. ६९**

**प्रतिवादीतर्फे साक्षीदारची जबानी शपथेवर सुरु.**

**नाव** – सुहास सुरेश बागल
**वय** – ३७ वर्षे,
**व्यवसाय** – शेती व कर सल्लागार
**राहणार** – भोसरे, ता. माढा, जि. सोलापूर.

**साक्षीदारचा सरतपास शपथेवर प्रतिवादीतर्फे विधीज्ञ श्रीमती. बी. एस. बनसोडे यांचेमार्फत सुरुः–**

१. मला माझ्या वडिलांच्या नावाचे साक्षी समन्स मिळाले होते. माझे वडील मयत आहेत. नोटरी दस्त क्र. ३२९/२०१८ चे रेकॉर्ड मी आज रोजी सोबत आणलेले नाही, कारण मी शोध घेतला असता ते मिळुन आले नाहीत. सदरची नोटरी माझे वडिलांच्या हस्ते झालेली आहे. मी माझ्या वडिलांची सही ओळखतो. आता मला झेरॉक्स नोटरी दस्त क्र. ३२९/२०१८ दाखवण्यात आला. त्यावर नोटरी म्हणुन माझ्या वडिलांची सही आहे. त्यावेळेस मी वडिलांच्या हाताखाली काम करत असल्यामुळे सदरची नोटरी माझ्यासमक्ष झालेली आहे. त्यातील हस्ताक्षर माझेच आहे. सदरची नोटरी ही ट्रॅक्टर खरेदीची पावतीची आहे. नोटरी दस्ताला **''अर्टिकल – अ''** देण्यात येते.

**सरतपास पूर्ण.**

**साक्षीदारचा उलटतपास वादीतर्फे विधीज्ञ श्री. ए.एस.जगताप यांचेमार्फत सुरुः–**

२. हे म्हणणे खरे आहे की, नोटरीचे मुळ रेकॉर्ड माझ्याकडे उपलब्ध नाही. हे म्हणणे खरे नाही की, अर्टिकल–अ वरील दस्त मुळ रेकॉर्ड प्रमाणे आहे असे सांगु शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, वाहनाची खरेदी विक्री नोटरीआधारे होत नसते. हे म्हणणे खरे नाही की, नोटरीवरील मजकुर मी टाईप केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, नोटरीवर माझे हस्ताक्षर आहे व माझ्या वडिलांची सही आहे हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आमच्या ऑफीसला सदरची नोटरी नोंदणीकृत

**वि.दि.दा. क्र. १/२०२२**
जिवराज वि मनोज
**निशाणी क्र. ६९**

केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या नावाचे साक्षी समन्स आलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, नोटरी दस्तावेळी मला नोटरीचे अधिकार नव्हते. हे मी सांगु शकत नाही की, मला नोटरीचे अधिकार नसल्यामुळे मला आज रोजी साक्ष देण्याचा अधिकार आहे किंवा नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी वादी व प्रतिवादी यांना व्यक्तीशः ओळखत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मनोज यांच्या सांगण्यावरुन आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by RAJU TUKARAM INGLE
Date: 2026.01.07 16:51:02 +0530

दिनांकः ०६.०१.२०२६

**(आर. टी. इंगळे)**
सह दिवाणी न्यायालय व स्तर, परंडा.